**डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ठेकामजूर - MIDH/ १९९/२०२१ दिनांक :– 07.10.2021

## जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा रोपवाटीका संचातील निर्धारीत खालीलप्रमाणे कामे ठेका पध्द्तीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील रोपवाटीका संचात एकात्मिक फलोद्यान विकास अभियान [ MIDH ] – मसाला पिके अंतर्गत कोकम कलमे तयार करावयाची आहेत. त्यासाठी निर्धारीत कामे **दि. ०१/११/२०२१ ते दि. २८/०२/२०२२** या कालावधीत ठेका पध्द्तीने करावयाची असून त्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २२.१०.२०२१** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | नर्सरी | कलम पिशव्यांत Pot Mixture भरणे, पिशव्या शेडमध्ये लावणे, कोकम रोपे वाफ्यावरून काढून पिशव्यांत लावणे, कलमकाड्या काढून कोकम कलमे बांधणे, नियमीत पाणी घालणे, बेणणी करणे, खते घालणे, किटकनाशक /बुरशीनाशक/संजीवके/विद्राव्य खते यांची फवारणी/आळवणी करणे तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| | | **एकूण** | **०३** |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :–**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२.३० व दुपारी ०२ ते ०५.३० )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत श्री.फि.भ.गावीत, प्रक्षेत्र व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधावा.
- दरपत्रक बंद पाकिटातून सादर करावयाचे असून पाकिटावर ठेका कामाचे दरपत्रक – **MIDH – कोकम कलमे निर्मिती** असा ठळक उल्लेख असावा.
- कोणत्याही कारणास्तव विहीत मुदतीत दरपत्रक या कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. अशा दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

Chavan

**कार्यक्रम समन्वयक,**
कृषि विज्ञान केंद्र,
देवधे,ता.लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :–**

१. मा. संचालक, *विस्तार शिक्षण,* डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदर जाहीर नोटीस चा मसुदा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द् करून मिळावा.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली
/– सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात यावे ही विनंती.

३. कार्यालय नोटीस बोर्ड, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा ( रत्नागिरी )